**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०५/२०१९**
**श्रृतिका वाटवे वि. गणेश वाटवे व इतर**
CNR No. MHJN090004462019

## निशाणी क्र. ५ वरील आदेश

अर्जदारांनी प्रस्तूतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम २३ अन्वये अंतरीम आदेशासाठी दाखल केला असून त्यांचे म्हणणे खालीलप्रमाणे आहेः

२] अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ हे पती–पत्नी असून सदर नातेसंबंधातून उभयतांना रिध्दी, सोहम व स्वरा अशी तीन अपत्ये झाली आहेत. गैरअर्जदार हा तिला अमानूषपणे मारहाण करीत आहे. याबाबत तिने कोलाड पोलीस ठाणे येथे वारंवार तक्रारी नोंदविल्या आहेत. सद्यस्थितीत अर्जदार व गैरअर्जदार हे एकाच घरात राहात आहेत. गैरअर्जदाराच्या हिंसक कृत्यांमूळे अर्जदार व त्यांच्या तीन अपत्यांच्या जिविताला धोका पोहोचला आहे. त्यामूळे गैरअर्जदाराने सामाईक घरातून विभक्त व्हावे व त्यात त्याला प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे. तिच्या म्हणण्यानूसार गैरअर्जदार हा मिनीडोर चालक असून तो दरमहा ३०,०००/– रूपये कमावित आहे. तो अर्जदारांस घरखर्चासाठी पैसे देत नसल्याने अर्जदार व तिच्या मूलांवर हलाखीची आर्थिक परिस्थिती निर्माण झाली आहे. ती मिळेल ते काम करून स्वतःचा व मूलांचा उदरनिर्वाह भागवित आहे. प्रसतूतचा अर्ज निकाली लागण्यास काही कालावधी जाऊ शकतो. त्यामूळे त्यांनी दरमहा १५,०००/– रूपये इतक्या अंतरीम आर्थिक साह्याची विनंती केली आहे.

३] अर्जाकामी गैरअर्जदार क्र. १ याने आपले म्हणणे नि. क्र. १५ वर दाखल केले. त्यात त्याने आपसातील नातेसंबंध मान्य केले आहेत. परंतू इतर मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानूसार अर्जदाराने वस्तूस्थिती लपवून प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे. तो त्याच्या वडीलांनी घेवून दिलेली विक्रम रिक्षा चालवून त्याला दरमहा पाच ते सहा हजार रूपये इतके उत्पन्न मिळते. अर्जदारोन कूठलेही रास्त कारण नसताना प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे. ती गैरअर्जदारास जाणिवपूर्वक जेवण न देणे, वारंवार त्याचा अपमान करणे, मानसिक छळ करणे, त्याच्यासोबत सतत भांडण करणे व त्याला मारहाण करणे अशी कृत्ये करीत आहे. अर्ज दाखल केल्यापासून तिने गैरअर्जदारास कधीही जेवण, नाष्टा, चहा–पाणी दिलेले नाही. तसेच तो कामावरून घरी आल्यावर जाणिवपूर्वक घराचा दरवाजा आतून बंद करणे, तो लवकर न उघडणे, त्याला घर सोडण्यासाठी धमकावणे अशी कृत्ये सूरू केली आहेत. तिने स्वतःच्या चूका लपविण्यासाठी प्रस्तूतचा खोडसाळ अर्ज दाखल केला आहे. तसचे तिने पत्नी म्हणून स्वतःच्या कूठल्याही जवाबदाऱ्या पार पाडल्या नाहीत. ती स्वतः आयूर्वेदिक उत्पादनांची विक्री करते. ती शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असल्याने ती स्वतःचा उदरनिर्वाह भागविण्यास सक्षम आहे. तिने प्रस्तूतचा अर्ज हा गैरअर्जदारास केवळ त्रास देण्याच्या हेतूने दाखल केला आहे. या कारणास्तव त्याने प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४] उभय पक्षांच्या वि. विधीज्ञांचा यूक्तिवाद ऐकला. खालील मूद्दे माझ्या विचारार्थ निघत असून मी त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| क्र. | मूद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने ती कौटूंबिक हिंसाचार पीडीत असल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे काय? | होकारार्थी |
| २. | अर्जदार ही संरक्षणात्मक आदेश मिळविण्यास पात्र आहे काय? | होकारार्थी |
| ३. | अर्जदार ही विनंती केल्याप्रमाणे अंतरीम आर्थिक साह्य मिळविण्यास पात्र आहे काय? | अंशतः होकारार्थी |
| ४. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मूद्दे क्र. १ व २ करीता–

५] अर्जदाराचे मूख्य म्हणणे असे आहे की, गैरअर्जदार हा तिला नेहमी मारहाण करतो. याबाबत तिने मूळ अर्जात सदर मारहाणीच्या घटनांबाबत तारीख व ठिकाणासह सविस्तरपणे कथन केले आहे. आपल्या कथनापूष्टयर्थ तिने कोलाड पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आलेल्या अदखलपात्र गून्हा क्र. २२०/२०१८ ची प्रत दाखल केली आहे. त्यात गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी तिला शिविगाळ केल्याचे नमूद आहे. त्यानंतर दिनांक १९.५.२०१९ रोजी तिने कोलाड पोलीस ठाणे येथे गैरअर्जदार क्र. १ याच्याविरूध्द फिर्याद दिली होती व त्यावरून त्याच्याविरूध्द अदखलपात्र गून्हा क्र. १२६/२०१९ नोंदविण्यात आला होता. त्यात तिला गैरअर्जदाराने हाताबूक्क्यांनी मारहाण करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्याचे नमूद आहे. तसेच तिने गैरअर्जदार क्र. २ व ३ यांच्याविरूध्द कोलाड पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरून त्यांच्याविरूध्द अदखलपात्र गून्हा क्र. १६७/२०१९ नोंदविण्यात आल्याचे दिसून येते. याउलट

गैरअर्जदार क्र. ३ हिने दिनांक १७.६.२०१९ रोजी व दिनांक १.८.२०१९ रोजी अर्जदाराविरूध्द कोलाड पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याचे व त्यावरून तिच्याविरूध्द अदखलपात्र गून्हा क्र. १६६/२०१९ व २०३/२०१९ हे नोंदविण्यात आल्याचे दिसून येते. यावरून उभयपक्षांनी एकेमेकांविरूध्द परस्पविरोधी तक्रारी दिल्या असल्याचे दिसून येते. त्यामूळे त्यांच्यात कौटूंबिक कलह असल्याचे स्पष्ट होते.

६] परंतू अर्जदाराने कौटूंबिक हिंसाचाराच्या घटनांचे सविस्तरपणे वर्णन केले आहे. त्यामूळे तिने दिलेल्या तक्रारी सकृतदर्शनी ग्राहय धरता येतील. याउलट गैरअर्जदाराचे म्हणणे आहे की, अर्जदारानेच त्याचा छळ केला आहे. परंतू याबाबत त्याने त्याचे लेखी म्हणणे व प्रस्तूतच्या अर्जाकामी दिलेल्या म्हणण्यामध्ये याबाबत संदिग्धपणे कथन केले आहे. त्यामूळे या बाबी विचारात घेता अर्जदार ही कौटूंबिक हिंसाचार पिडीत असल्याचा सकृतदर्शनी अनूमान निघतो. अन्यथा अर्जदारास वारंवार तक्रारी देण्याचे व या न्यायालयात दाद मागण्याचे कूठलेही कारण नाही. त्यामूळे तिच्या हक्कात संरक्षणात्मक आदेश पारीत करणे योग्य ठरेल असे माझे मत आहे. या कारणास्तव मी मूद्दे क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मूद्दा क्र. ३ करीता–</u>**

७] अर्जदाराच्या म्हणण्यानूसार गैरअर्जदार हा मिनीडोअर चालक असून त्यापासून त्याला दरमहा ३०,०००/– रूपये इतके उत्पन्न मिळते. तो मिनिडोअर चालवितो ही बाब गैरअर्जदारानेही मान्य केली आहे. परंतू त्याच्या म्हणण्यानूसार त्याला

महिन्याकाठी ५ ते ६ हजार रूपयांचे उत्पन्न मिळते. त्याच्या उत्पन्नाबाबत अर्जदाराने ठोस असा कूठलाही कागदोपत्री पूरावा दाखल केला नाही. अर्जदार व गैरअर्जदार हे एकाच घरात राहात असल्याचे समोर आले आहे. परंतू अर्जदाराने स्पष्टपणे म्हटले आहे की, गैरअर्जदार तिला घरखर्चासाठी पैसे देत नाही. याउलट गैरअर्जदाराच्या म्हणण्यानूसार अर्जदार ही आयूर्वेदिक उत्पादने विक्रीचा व्यवसाय करीत आहे. त्यामूळे ती स्वतःचा उदरनिर्वाह भागविण्यास सक्षम आहे. परंतू ती कूठे सदर विक्रीचा व्यवसाय करते याविषयी त्याने सविस्तर खूलासा केलेला नाही. त्यामूळे तो तिला घरखर्चासाठी पैसे देत नसल्याचा सकृतदर्शनी अनूमान निघतो. तसेच गैरअर्जदार क्र. २ याची शेती असल्याचेही समोर आले आहे. त्यापासून त्यांना काही ना काही उत्पन्न मिळत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

८] त्यामूळे एकूण वस्तुस्थिती पाहता, तो अर्जदारांच्या पालनपोषणाकडे दूर्लक्ष करीत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. उभयताना लग्नसंबंधातून तीन अपत्ये आहेत. अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असून रिध्दी, सोहम व स्वरा ही त्यांची अपत्ये आहेत. त्यामूळे अर्जदार हा त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी नाकारू शकत नाही. ते त्याचे कर्तव्य आहे. म्हणून या सर्व बाबी विचारात घेता अर्जदाराच्या हक्कात अंतरीम आर्थिक साहय मंजूर करणे न्यायोचित ठरेल. परंतू तिने केलेली दरमहा १५,०००/- रूपयांची मागणी सरसकट मंजूर करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे अधिनियमातील तरतुदींचा उद्देश, आजची महागाई व अर्जातील उभय पक्षांची एकूण कथने या सर्व बाबींचा सारासार विचार करता अर्जदार हिच्या हक्कात प्रस्तुत अर्ज

दाखल तारखेपासून ते त्याच्या अंतिम निकालापर्यंत दरमहा रुपये २,५००/–इतके अंतरीम आर्थिक साह्य मंजूर करणे न्यायोचित ठरेल. या कारणास्तव मी मूद्दा क्र. ३ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत मूद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (नि. क्र. ५) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारांनी प्रस्तूत प्रकरणाच्या अंतिम निकालापर्यंत अर्जदार व मूले नामे रिध्दी, सोहम व स्वरा यांच्याविरुध्द कुठलाही कौटुंबिक हिंसाचार करू नये व त्यांना सहभागी घरातून बाहेर काढू नये असा अंतरीम आदेश पारीत करण्यात येतो.

३. गैरअर्जदार क्र. १ याने प्रस्तूत अर्ज दाखल तारखेपासून ते त्याच्या अंतिम निकालापर्यंत अर्जदार हिला दरमहा रुपये २,५००/– (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र) इतके अंतरीम आर्थिक साह्य अदा करावे, असा आदेश पारीत करण्यात येतो.

४. या आदेशाबाबत संरक्षण अधिकारी व संबंधीत पोलीस ठाणे यांना कळविण्यात यावे.

५. या आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना मोफत देण्यात यावी.

---स्वाक्षरी---

दिनांक – ३१/०८/२०१९

(स. दि. कमलाकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
रोहा, जि. रायगड.